

साप्ताहिक

# चपराक

चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

• वर्ष : १८
• अंक : ५
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-


www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२



'Industrial Efficiency Award' Winner

■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants

For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in



■ सोमवार, दि. १६ ते २२ मार्च २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979


# साहित्य परिषदेत 'भाजप' विजयी

**पुणे : साम, दाम, दंड, भेद नीतीचा वापर करत साहित्य संस्था ताब्यात घ्यायच्याच या ईर्षेने पेटलेल्या भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्र साहित्य परिषदेवर विजय मिळवला आहे. राजकारण्यांचे साहित्य क्षेत्रात काय काम?, असा प्रश्न सातत्याने विचारणाऱ्यांकडून आता साहित्यातील आद्य संस्थाही ताब्यात घेण्यात आली आहे. भाजपचे अनेक नगरसेवक, आमदार आणि खासदारही साहित्य परिषदेच्या निवडणुकीत सक्रिय झालेले पहिल्यांदाच दिसून आले असून 'साहित्य हरले आणि राजकारण जिंकले,' अशीच भावना साहित्यरसिकांत आहे.**

प्रा. मिलिंद जोशी, विनोद कुलकर्णी आणि सुनीताराजे पवार यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या विरुद्ध जंग जंग पछाडत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांची यंत्रणा कार्यान्वित केली होती. एकेक मतपत्रिका मिळावी म्हणून स्थानिक नगरसेवक मतदारांकडे सातत्याने चकरा मारत होते. विविध संस्थांत कार्यरत असलेल्या मतदारांना 'तुला इथे नोकरी करायची आहे तर मतपत्रिका दे,' असे धमकावले जात होते. साहित्य परिषदेच्या विविध शाखांना सांगितले जात होते की, 'आम्हाला मतदान दिले तर आम्ही तुमच्या शाखेला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊ! मतपत्रिका दिल्या नाहीत तर आम्ही निवडून आल्यावर तुमच्या शाखेची मान्यता रद्द करू!' काही ठिकाणी ग्रामपंचायत निवडणुकीप्रमाणे पैशांचेही वाटप करण्यात आले.

मतमोजणीसाठी ज्या मतपत्रिका आल्या होत्या त्या फाडून त्यातील ओळखपत्रे वेगळी करायची होती. त्यानंतर मतमोजणी करायची असल्याने या पत्रिका बाहेर नेऊन खासगी प्रेसवाल्याकडून कापून आणायच्या ठरल्या. हे अतिशय धोकादायक असल्याने 'आम्ही साहित्य परिषदेतच कटिंग मशिन आणून देतो,' अशी भूमिका प्रा. मिलिंद जोशी यांच्या परिवर्तन उत्कर्ष आघाडीने घेतली होती; मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांना न जुमानता या पत्रिका बाहेर नेल्या. कटिंग मशिनवर 'छाट' मारून त्या फोडलेल्या मतपत्रिका परिषदेत आणल्या गेल्या.

> भाजपने (म्हणजेच संघाने) हिरीरीने सर्व राजकीय फंडे वापरून महाराष्ट्र साहित्य परिषदेची निवडणूक लढवली आणि
>
> 
>
> जिंकलीही. 'साहित्यात राजकारण नको' म्हणणारे राजकारण्यांच्या नादी लागून स्वत:च राजकारणी कधी झाले हेही कळाले नाही. हे सारे घडत होते तेव्हा सारेच मतदार साहित्यिक हे पाहत होतेच पण एकानेही या गैरप्रकारांबाबत साधी नापसंतीही व्यक्त केली नाही. यावरूनच साहित्य आणि साहित्यिकांचा दर्जा किती खालावलेला आहे हे लक्षात यावे आणि हे लोक जगाला ज्ञान पाजण्याचे ढोंगे करणार! या सर्वात बळी जातोय तो साहित्याचा, साहित्य-विचारांचा याचे भानही कोणाला नसावे? तिकडे भाजपच्या पाठिंब्याने विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत गिरीश गांधी निवडून आले. साहित्य संस्था राजकारण्याचे अड्डे बनण्याची ही सरकारी हमी आहे. मी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आजीव सदस्यत्वाचा राजीनामा देतो आहे.
>
> **– संजय सोनवणी**
> सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक

> 
>
> निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. प्रताप परदेशी हे सरकारला विकले गेलेले गद्दार निघाले. स्वत: दत्तगुरुचे भक्त असल्याचा आव आणत त्यांनी न्यायप्रकियेला काळिमा फासला आहे. आमच्या मतपत्रिका आम्हाला दाखवण्यात आल्या नाहीत. संजीव खडके यांनी दहा मिनिटांत चारशे मते विरोधकांना मिळाल्याचे वाचून दाखवले. त्या मतपत्रिकांवर नेमके कुणाची मते होती हे जाणून घेण्याचा आमचा अधिकार डावलण्यात आला.
>
> **– विनोद कुलकर्णी**

> 
>
> एकूण किती मतदान झाले हे शेवटपर्यंत जाहीर केले नाही. मतमोजणीत अनेक गैरप्रकार करण्यात आले. आमच्या आघाडीने ६२०० मतपत्रिकांचे गठ्ठा मतदान केले होते. त्याचे तपशीलही आमच्याकडे आहेत. मग ती मते आम्हाला कशी मिळाली नाहीत?
>
> **– सुनीताराजे पवार**

१. परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या उमदेवार मृणालिनी कानिटकर-जोशी यांना ८१६ मते मिळाली होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मात्र त्यांना ७७७ मते मिळाल्याचे सांगून पराभूत घोषित केले.
२. वास्तू विभागाचे कार्यवाह प्रमोद आडकर हे पाचव्यांदा निवडणुकीसाठी उभे होते. त्यांचाही आश्चर्यकारक पराभव झाला.
३. परिवर्तन उत्कर्ष आघाडीचे उमेदवार शिरीष चिटणीस हे असंख्य मतदारांपर्यंत प्रत्यक्ष पोचले होते. त्यांना ७५६ मते मिळाल्याचे सांगून पराभूत घोषित करण्यात आले. आपल्याला मिळालेली मते वाचलीच गेली नाहीत, असा दावा त्यांनी केला आहे.

मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांचा प्रतिनिधी अशा एकाला मतमोजणी कक्षात बसता येणार होते. त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नेमलेले प्रतिनिधी पत्रिका त्यांच्या समोर धरून ज्यांना मते मिळाली आहेत, त्यांची नावे वाचून दाखवत होते. सलगपणे १०३, १०५ मते साहित्य संवर्धन पॅनेलला मिळाल्याचे ते जाहीर करत होते. त्यानंतर काही मते परिवर्तन उत्कर्ष आघाडीला मिळाल्याचे सांगत होते. ओळखपत्रे बाजूला काढल्याने 'या पत्रिकेवर ज्यांची नावे आहेत, त्या पत्रिका आम्हाला दाखवा' असा आग्रह परिवर्तन उत्कर्ष आघाडीच्या उमेदवारांनी धरला मात्र त्यांना न जुमानता 'आमचे काम आम्हाला करू द्या' म्हणत ते फक्त साहित्य संवर्धनच्या उमेदवारांची नावे वाचत होते. नैतिकतेच्या, प्रामाणिकतेच्या गप्पा मारणाऱ्यांकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना खिशात टाकले होते, हे सगळे उघडपणे दिसत होते.

महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते आणि लेखक प्रा. मिलिंद जोशी यांचा अवघ्या ४५ मतांनी पराभव झाल्यानंतर साहित्य परिषदेत भाजपच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांनी गर्दी केली. भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांचे आगमन झाल्यानंतर 'राजेश पांडे आगे बडो, हम तुम्हारे साथ है'च्या घोषणांनी वातावरण दणाणून गेले. एखाद्या ग्रामपंचायतीची निवडणूक जिंकल्यानंतर ज्याप्रमाणे त्यांच्या पक्षनेत्यांना त्याचे श्रेय दिले जाते त्याप्रमाणेच हा विजय पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदींना 'समर्पित' करण्यात आला. पुढील पाच वर्षात साहित्य परिषदेचे स्वरूप काय असेल याची प्रचिती येत होती.

मतमोजणी शेवटच्या टप्प्यात आलेली असताना अध्यक्षपदाचे उमेदवार योगेश सोमण बाहेर आले. तिथे बसलेल्या शिरीष चिटणीस, अंजली कुलकर्णी, मृणालिनी कानिटकर-जोशी आदींना ते म्हणाले की, 'पेशंट आयसीयूमध्ये शेवटच्या घटका मोजतोय आणि तुम्ही त्याला न्यायची तयारी करताय, असे मला वाटतेय. पुढच्या दोन वर्षात मी आमदार झालेलो असेल. तोपर्यंत काय होतेय ते बघूया!'

त्यानंतर मतमोजणी पूर्ण झाल्याने सगळे जण खाली आले. माधवराव पटवर्धन सभागृहाचा दरवाजा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आतून लावून घेतला होता. त्यांची पुढील औपचारिकता सुरू होती. रात्रीचे दहा वाजत आल्याने पत्रकार अधिकृत निकाल घेण्यासाठी मसापच्या दारात थांबले होते. त्यावेळी पुन्हा योगेश सोमण तिथे आले आणि म्हणाले, 'घरात मयत झालीय आणि तुम्ही सगळे प्रेत न्यायला आलाय, असे मला वाटतेय.' संघ आणि भाजपच्या बळावर निवडून आलेल्या उमेदवाराची ही विकृत भाषा बघून उपस्थित अचंबित झाले.

दरम्यान, प्रा. मिलिंद जोशी, विनोद कुलकर्णी, सुनीताराजे पवार यांनी या निवडणुकीवर आक्षेप घेत फेरमतमोजणीची मागणी केली मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्याला नकार दिला. त्यामुळे या निवडणूक प्रक्रियेविरुद्ध न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सावध ऐका पुढल्या हाका



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०

**सध्या जग एका यद्धाच्या खाईत लोटले गेले आहे. युद्ध तीन देशात होत असले तरी त्याचे परिणाम जगालाच भोगावे लागत आहेत. जगात कोणताही देश स्वावलंबी नाही हे पुन्हा समोर आले आहे. विज्ञान क्रांती झाल्यानंतर माणसांचे आणि देशाचे परावलंबित्व आणखी वाढत चालले आहे. युद्ध ज्या देशांमध्ये होते आहे, त्या देशाबरोबर इतर देशही अडचणीत सापडले आहेत. आज या युद्धात अमेरिकेसारखा देश सर्वात आघाडीवर आहे.**



जगावर साम्राज्य प्रस्थापित व्हावे म्हणून इतिहासात अनेक देशांनी प्रयत्न केले. वर्तमानातही तसेच प्रयत्न जगातील अनेक देश करत आहेत. अनेकदा युद्ध महासत्तेच्या स्वप्नासाठी, शस्त्रास्त्राचा व्यापार करणाऱ्या देशांचे उत्पादन विकण्यासाठी, आपले वर्चस्व प्रस्थापित होण्यासाठी केली जातात. युद्ध हे मानवी विकृतीचे प्रदर्शन आहे. माणसाला सुखी होण्यासाठी नाही तर माणसाच्या आयुष्यात दुःखाची वाट निर्माण करण्यासाठी युद्धं लढली जात आहेत. जग जवळ आले आहे, हे खरेच. त्यामुळे बरे-वाईट परिणाम देखील एकमेकांवर पटकन होत आहेत.

आईन्स्टाईन यांनी अणुबॉंब निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे सूत्र शोधले होते. त्या सूत्रातून निर्माण होणाऱ्या शक्तिची जाणीव त्यांना देखील होती. शेवटी विज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. आपण ते कसे वापरतो त्यावर बरेच काही अवलंबून असणार आहे. चांगल्यासाठी वापरले जावे अशी अपेक्षा ठेवण्यात काही गैर नाही पण त्या वाटांचा प्रवास खरंच तसा घडतो आहे का? याचा विचार केला तर विज्ञानाने जीवनात जितका आनंद निर्माण केला आहे, तितकीच भीती देखील निर्माण केली आहे. पदार्थाच्या अगदी छोट्यातील छोट्या कणात देखील प्रचंड शक्ती सामावलेली असते हे वैज्ञानिकांच्या लक्षात आले. त्याच्या मुळाशी जाण्याच्या दृष्टिने जगभरातील वैज्ञानिकांनी प्रयत्न सुरू केले होते. ऑटोहान आणि स्ट्रॉसमन यांनी युरेनिअमच्या अणु केंद्रावर न्युट्रॉनचा मारा करून १९३८ साली त्या शक्तिच्या मुळाशी जाण्यात या वैज्ञानिकांना यश मिळाले होते. या एका घटनेमुळे अणुबॉंब निर्मितीची शक्यता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत या शोधाचा वापर करून हिटलरने अणुबॉंब बनवला तर जग वेगळ्याच संकटात सापडेल असे त्यावेळी वैज्ञानिकांना वाटले होते. म्हणून या संशोधनातून जर्मनीने अणुबॉंब तयार करण्यापूर्वी अमेरिकेने तयार केला तर चांगले असे वैज्ञानिकांना वाटले कारण जर्मनीवर हिटलर राज्य करत होता. त्याच्या वृत्तीचा तोवर जगाला अंदाज आला होता. त्यामुळे आईन्स्टाईन यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना त्यासंदर्भात तात्काळ कळवले.

अमेरिकेच्या हाती या निमित्ताने मोठी शक्ती आली होती. मग या संशोधनाचा फायदा घेत अमेरिकेने अत्यंत गुप्तपणे अणुबॉंब तयार केला. त्या दरम्यान दुसऱ्या महायुद्धाला सुरूवातही झाली होती. जग त्या महायुद्धाने विभाजित झाले होते. अशावेळी जपानने आपल्यासमोर शरणांगती स्वीकारावी यासाठी प्रयत्न सुरू होते पण जपान नमत नाही हे पाहिल्यावर हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर अणुबॉंबचा हल्ला करण्यात आला. त्यात ही शहरे बेचिराख झाली होती. या करण्यात आलेल्या हल्ल्यासंदर्भात आईन्स्टाईन यांना पूर्ण अंधारात ठेवण्यात आले होते. या घटनेचे वृत्त ऐकल्यावर आईन्स्टाईन यांना धक्का बसला होता. आपण नेमके कशासाठी अमेरिकेला अणुबॉंब बनवण्यास सांगितले होते पण त्यांनी केलेला दुरुपयोग त्यांनाही चिंता करायला लावणारा होता.

खरं तर जगातील कोणतेही युद्ध हे वाईटच असते. जगाच्या इतिहासात साधारणपणे चौदा हजार युद्धे झाली असे मानले जाते. त्यातील साडेबारा हजार युद्धं ही साधारण धर्मसंघर्षातून झाली आहेत; तर उर्वरित युद्धापैकी अनेक युद्धे ही साम्राज्यवादातून उभी ठाकली आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचा इतिहास पाहता अमेरिकेने साधारणपणे साम्राज्यवादी भूमिकेतून पाऊनशे युद्धं जगावर लादली आहेत. एकदा कोणी तरी आईन्स्टाईन यांना असेही विचारले होते की, ''दुसरे महायुद्ध कसे खेळले जाते आहे, ते तुम्ही जाणता आहात मात्र तिसरे महायुद्ध नेमके कोणत्या शस्त्रांनी खेळले जाईल असे तुम्हाला वाटते?'' तेव्हा ते म्हणाले होते की, ''तिसरे महायुद्ध कोणत्या शस्त्राने खेळले जाईल हे मला माहीत नाही पण चौथे महायुद्ध मात्र दगडांनी खेळले जाईल.''

याचा नेमका अर्थ काय ? त्यांच्या बोलण्याचा हेतू, भाव लक्षात घेतला तर तिसऱ्या महायुद्धानंतर विश्व खरंच अस्तित्वात राहील का याबद्दल शंका येते आहे. एका व्यक्तिने त्यांना तिसऱ्या महायुद्धाविषयी आणखी काही प्रश्न विचारले होते तेव्हा ते म्हणाले होते की, ''मला तिसऱ्या महायुद्धाविषयी फार काही सांगता येणार नाही पण चौथ्या महायुद्धाविषयी मी अधिक काही सांगू शकेल...'' तेव्हा प्रश्न विचारणाऱ्यांनी अधिक औत्सुक्याने त्या विषयी ''सांगा'' असे म्हटले तेव्हा ते म्हणाले ''तिसऱ्या महायुद्धात कोणी वाचले तरच चौथे महायुद्ध होऊ शकेल.''

विज्ञान-ज्ञानाच्या जोरावर आपण क्रांती केली असली तरी या संशोधनाने जगाच्या कल्याणाची वाट सापडायला हवी असताना आज आपण विज्ञानाच्या सोबतीने विध्वसंकतेचा पाया घालत आहोत. त्याचा परिणाम माणसांवर होईलच पण निसर्गावर देखील अत्यंत विपरित परिणाम झालेला आपणास अनुभवास येईल. त्यामुळे या वाटेचा प्रवास किती धोकादायक आहे याचा विचार करायला हवा.

खरं तर कोणतेही युद्ध हे नेहमीच विध्वसंक असते. आता होणाऱ्या युद्धात ज्या पद्धतीने शस्त्रास्त्र वापरली जात आहेत, एकमेकांवर हल्ले होत असताना तेल विहिरींना आग लावली जात आहे त्याचा आर्थिक विकासावर परिणाम होईल पण त्याचा पर्यावरणावर किती विपरित परिणाम होईल याचा अंदाज तरी केला गेला आहे का? त्याचवेळी निसर्गाची होणारी हानी पुन्हा वेगळी. आज युद्धात माणसं मारली जात आहेत, निसर्ग उद्ध्वस्त केला जात आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचा नाश केला जात आहे. अशावेळी जगातील विवेकवादी आणि शहाणपण असलेल्या कोणत्याही नागरिकाला हे घडू नये असेच वाटत असणार यात शंका नाही. आज जगातील काही राष्ट्रांकडे अण्वस्त्र आहेत, अणुबॉंब आहेत. अशा परिस्थितीत युद्धात ते देश याचा वापर करणारच नाहीत असे हमखास कोणी सांगू शकणार नाही. त्याचा वापर केला तर ते देश उद्ध्वस्त होतील पण त्याचा परिणाम एकूणच जगाला भोगावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अवघे जगच आज अनामिक भीतीखाली जगते आहे. जगापुढे विवेकवादी नेतृत्त्वाची अधिक गरज अधोरेखित होऊ लागली आहे. समाज जेव्हा कोणाला निवडून सत्तेच्या स्थानी बसवत असतो तेव्हा तो केवळ एक प्रतिनिधी नसतो तर जगाच्या विनाशाची शक्ती देखील त्याच्या हाती प्रदान करत असतो. नेतृत्वाच्या हाती समाज व राष्ट्राचा उद्धार करण्याची शक्ती जशी आहे तशी विनाशाची देखील आहे. म्हणून जगानेच आता विचार करण्याची वेळ आली आहे. एक अविवेकी नेतृत्व जगाचा नाश करण्यास देखील पुरेसे ठरू शकते. जागतिकीकरणाच्या पाऊलवाटेवरील हे नेतृत्व कोणत्याही महासत्तेची स्वप्नं पाहणाऱ्या देशाचे असू शकते. म्हणूनच 'सावध ऐका पुढल्या हाका' असे म्हणण्याची वेळ आली आहे.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# मनोरंजक आणि माहितीपूर्ण : परदेशातल्या पाऊलखुणा



डॉ. संदीप गजानन श्रोत्री
सातारा
९८२२०५८५८३

**अनिल दातीर यांनी लिहिलेल्या आणि 'चपराक प्रकाशन'तर्फे प्रकाशित होत असलेल्या 'परदेशातल्या पाऊलखुणा' या पुस्तकाचे प्रकाशन रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी समारंभपूर्वक होत आहे. या पुस्तकाला सातारा येथील डॉ. संदीप गजानन श्रोत्री यांनी लिहिलेली ही प्रस्तावना. हे पुस्तक आपण 'चपराक'च्या संकेतस्थळावरून घरपोहोच मागवू शकाल.**

अनिल दातीर हा माझा मित्र. त्याचे आणि माझे आपापल्या क्षेत्रामधील व्यावसायिक जीवन साधारण एकाच वेळी आणि शेजारी शेजारी सुरु झाले. तो वास्तुविशारद आहे. सातारा शहरातील देवी चौक ह्या तत्कालीन मध्यवर्ती असणाऱ्या भागामध्ये माझा शाळकरी मित्र नितीन कुलकर्णी ह्याच्या कार्यालयात तो नोकरीसाठी रुजू झाला आणि त्याच दरम्यान आम्ही दत्तकाशी रुग्णालय देवी चौकात जुन्या वाड्यात सुरू केले होते. (१९९१-९२). दुर्गम अकोले तालुक्यातल्या गणोरे नावाच्या एका छोट्या खेड्यातून तो सातारा शहरात आला होता. अतिशय कष्टाने, चिकाटीने आणि जिद्दीने त्याचा प्रवास हा थेट त्याच्या बिल्डर असोसिएशनच्या अध्यक्षपदापर्यंत कसा झाला, ह्याचा साक्षीदार मी आहे. काळाच्या रेट्यात आणि ओघामध्ये आम्ही देखील जुन्या वाड्यात सुरु केलेल्या रुग्णालयाचे रुपांतर नव्या सुसज्ज इमारतीमध्ये केले ते त्याच्याच नियोजनानुसार कारण आमचे रुग्णालय, माझे घर यांचे आराखडे त्यानेच केले होते.

आमच्या दोघांत आणखी एक साम्य आहे, ते म्हणजे भटकंतीचे आणि त्या भटकंती दरम्यान जे जे आम्ही आमच्या नजरेने टिपले, जे जे आम्ही अनुभवले ते ते कागदावर लिहून जोडीला उत्तम छायाचित्रे काढून सर्वसामान्य लोकांपुढे ठेवण्याचे! स्थानिक वर्तमानपत्रे आणि समाजमाध्यमे यावर प्रसिद्ध करणे! अनिल हा मोठा लोकप्रिय असा लेखक किंवा ब्लॉगर आहे, ह्यात शंका नाही.

'परदेशातल्या पाऊलखुणा' हे अनिलचे पहिले पुस्तक आज वाचकांपर्यंत येत आहे, ह्याचा मला विलक्षण आनंद झाला आहे. ह्या पुस्तकात अनिलने केलेल्या एकूण दहा-पंधरा देशांच्या भटकंतीचे वर्णन आले आहे. वाचकांसाठी ही एक मोठी मेजवानी आहे ह्यात वादच नाही. सुरुवातीलाच लेखक लिहितो की त्यांच्या बिल्डर असोसिएशनची दरवर्षी एकतरी परदेशी वारी असतेच. अर्थात ती कुणी स्पॉन्सर करत नसतात, आपापल्या खर्चानेच करायची असते हे मुद्दाम लेखक लिहितो! आवड असेल तर सवड मिळतेच हे खरे आहे. त्या जोडीला असेही म्हणत येईल की आवड असेल तर रोकड देखील उपलब्ध होते!

एकूण आठ प्रकरणामध्ये निम्म्या युरोपची आणि काही आशियाई देशांची सहल वाचकाला घडते. युरोप खंडातील देश का निवडले, ह्याचे कारण लेखक सांगतो, कारण हे देश फार लांबही नाहीत आणि जवळही नाहीत. सहा-सात तास विमान प्रवास आणि आपल्या खिशाला परवडतील असे राहणीमान असते. त्याच वेळी सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत वैभवशाली आहेत.




तेथील थंड आणि अतिथंड वातावरणामुळे तेथील इमारतींना देखील फारशी हानी झाली नाही. अनिल स्वतः वास्तू विशारद असल्यामुळे आपल्याकडील इमारती उन-वारा-पाउस ह्यांनीच लवकर खराब होतात, हे आवर्जून लिहितो. त्यांच्या सर्व सहली ह्या ग्लोबल हॉलिडेज या कंपनीने निश्चित केल्यामुळे त्याचे मालक श्री. अल्ताफभाई यांची आणि अनिलची उत्तम दोस्ती झाली आहे, ह्यात नवल नाही परंतु त्यामुळे सहल नियोजन हे जास्त वैविध्यपूर्ण आणि आपुलकीचे होते हे वाचकांनी लक्षात घ्यायला हवे. आपल्या अपेक्षा ह्या आयोजकांना माहिती असतात.

अनिल हा डोळस पर्यटक आहे, जागरूक प्रवासी आहे, सूक्ष्म निरीक्षणशक्ती त्याला लाभली आहे. सहली आयोजन करताना तो देशांची निवडही अगोदर अभ्यास करून मगच करत असतो. त्याचा मित्रपरिवार त्याला उत्तम साथ करतो. हिंडता फिरताना कॅमेऱ्यावरील क्लिक बटण हे अतिशय कौशल्याने तो दाबत असतो. तेथील गाईड माहिती करून देताना त्याचे कान तीक्ष्ण असतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याची स्मरणशक्ती, प्रवासादरम्यान बघितलेल्या ठिकाणांची माहिती योग्य शब्दात उतरविण्याची त्याची कला हे सर्व गुण आपल्याला ह्या पुस्तकात दिसून येतात. त्याच वेळी उत्तम बोलके फोटो बघायला मिळतात. त्याचे स्वतःचे फोटो कमी पण त्याने पाहिलेल्या गोष्टींचे फोटो जास्त असतात. त्यामुळे हे प्रवासवर्णन एखाद्या प्रवासी कंपनीची पुस्तिका न वाटता, मनोरंजक आणि माहितीपूर्ण असा खजिना वाचकांना उपलब्ध होतो. त्याच्यामध्ये दडलेल्या एका अतिशय उत्तम अशा साहित्यिकाची झलक बघायला मिळते.

त्याने भेटी दिलेल्या देशांची यादी बघितली तरी आपण अवाक होतो. जर्मनी, लक्झेम्बर्ग, बेल्जियम, पोलंड, उझबेकिस्तान, स्पेन, दुबई, सिंगापूर, रशिया, इजिप्त, हंगेरी, नेदरलंड, स्लोवाकिया आदी देशांच्या सहलीचे या पुस्तकात वर्णन केले आहे. पोलंडमधील छळ-छावण्या बघताना तो गहिवरून येतो तर हिमाच्छादित आल्पस पर्वतशिखरे बघताना उल्हासीत होतो. ताश्कंदमधील लालबहादूर शास्त्री यांच्या शेवटच्या मुक्कामाच्या हॉटेलसमोर तो नतमस्तक होतो, तर एअर इंडिया विमानातील वाईट अनुभव लिहिताना मुद्दाम टाटा उद्योग समूहाचा आदराने उल्लेख करतो. सदैव त्या त्या देशाची आणि भारताची नकळत तुलना करत असतो. परदेशातील चांगल्या बरोबरच वाईट गोष्टी, चालीरीती आणि संस्कृतींची देखील माहिती आपल्याला ह्या वर्णनात वाचायला मिळते. व्हिसा, विमानप्रवास पासून ते तेथील करन्सी, शॉपिंग मॉल आणि स्थानिक प्रवास साधने हे देखील ह्या पुस्तकात मुद्दाम सांगितले आहे. दुबई येथील इमारती ह्या अनिलच्या वास्तू-विशारदाच्या नजरेने बघताना आपल्याला अधिक समाधान लाभते. सिंगापूर विमानतळ हे स्वतःच एक मोठे प्रेक्षणीय स्थळ आहे, हे वाचताना आपल्याला आश्चर्य वाटल्यावाचून राहवत नाही.

परदेशवारीमधील असे अनेक अनुभव आणि भारत आणि तो विदेश ह्यांचे तुलनात्मक वर्णन वाचताना आपण केव्हा लेखकाबरोबर प्रवास करत आहोत असा भास व्हायला लागतो हे कळत नाही. प्रत्येक देशाचे वर्णन करत बसत नाही. वाचकाची उत्सुकता चाळवणे हे प्रस्तावनेचे काम आहे. कुकरच्या पहिल्या शिट्टीमध्ये आत काय शिजते आहे, ह्याचा घमघमाट नाकाला येतो, तशीच ही प्रस्तावना आह. आतमधील आंबेमोहर भाताचा स्वाद प्रत्येक वाचकाने घ्यावा.

ह्या पुस्तकातील एक अनुभव मात्र आपल्याला चटका लावून जातो, अंतर्मुख व्हायला लावतो, तो सांगतो आणि ही प्रस्तावना पूर्ण करतो. अनिल रशियामधील स्वच्छता, सुबत्ता आणि शिस्त बघून लिहितो, 'आमच्या पैकी एक मित्र म्हणाला की, आपल्या आजोबा, पणजोबा ह्यांना का नाही वाटले की अशा देशात जाऊन राहायचे? मग आपलाही जन्म ह्याच देशात झाला असता?

त्यावर लेखक लिहितो, 'आपण आठ-दहा दिवस येथे येतो आणि आपल्याला असे वाटले तर मग आपली मुले शिकण्यासाठी विदेशात जातात, दोन-तीन वर्षात त्याच देशांची होऊन जातात, त्यात त्यांना मातृभूमीचा विसर पडला, म्हणून आपण दोष देणे किती चुकीचे आहे?' याचबरोबर 'मला मात्र भारत सोडून कोणत्याही देशात राहण्याची इछा झाली नाही' हेही तो आवर्जून सांगतो.

गेली चार-साडेचार वर्षे आम्ही सातारा शहर आणि आसपासच्या भागातील उत्तम पुस्तक वाचकांचा 'आम्ही पुस्तकप्रेमी समूह' तयार केला आहे. आजपर्यंत (जानेवारी २०२६) गेले दोन हजार दिवस रोज सकाळी एका नवीन पुस्तकाचा परिचय आमच्यापैकी एक जण लिहित असतो. हे व्रत अखंड चालू आहे. अनिल हा आमच्या समूहाचा एक चोखंदळ वाचक आणि उत्तम परिचय करता आहे. तो एक जागरूक नागरिक आहे. मुळात आमच्या समूहाचे ब्रीद हे आहे की

**'जे जे आपण वाचिले, ते ते वर्णावे ऐसे,**
**सहयात्री करोनी सोडावे, सकल वाचक.'**

ह्या ओळी सार्थ करणारे त्याचे लेखन असते. त्याचा प्रत्यय वाचकाना त्याच्या ह्या पुस्तकात देखील आल्याशिवाय राहणार नाही. मुळात अनिल ह्या नावाचा अर्थच 'वारा' असा. त्यामुळे पायात भिंगरी घेऊन जन्माला आलेल्या अनिल ला भविष्यातील भटकंतीसाठी खूप खूप शुभेच्छा आणि त्याच्या ह्या 'परदेशातल्या पाउलखुणा' ह्या पुस्तकाबद्दल अभिनंदन. ह्या पाऊल खुणा अशाच दुरदूर उमटत जाव्यात आणि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत आमच्यासारखे वाचक देखील चालत राहोत, ही अपेक्षा.



**नागेश शेवाळकर**
९४२३१३९०७१




# गुढीपाडव्याची महती

**हिंदू संस्कृतीमध्ये सणांना फार महत्त्वाचे स्थान आहे. संक्रांत, होळी, दसरा, दिवाळी इत्यादी अनेक सण आपण मोठ्या प्रमाणात साजरे करतो. 'दसरा सण मोठा, नाही आनंदाचा तोटा' याप्रमाणे मोठा आनंद मिळतो. एक आगळेवेगळे समाधान, अनोखी स्फूर्ती, चेतना मिळते. काही नवीन संकल्प करून ते तडीस नेण्याची ऊर्जा मिळते. नवनिर्मितीची आस निर्माण होते. असाच एक अत्यंत प्रेरणादायी, उत्साहवर्धक, आनंददायी सण म्हणजे गुढीपाडवा! चैत्र शुद्ध प्रतिपदेला हा सण घरोघरी साजरा केला जातो. संत ज्ञानेश्वर या सणाची महती वर्णन करताना लिहितात...**

**अधर्मांचि अवधी तोडी।**
**दोषांची लिहलीं फाडीं।**
**सज्जनांकरवी गुढी।**
**सुखाची उभवी।।**

विष्णूदास यांच्या अभंगातही गुढीपाडवा आणि प्रभू श्रीरामचंद्र यांचे चौदा वर्षांच्या वनवासानंतर आगमन झाले याचा संदर्भ येतो. विष्णूदास लिहितात,

**अजिंक्य जिंकोनी आले कौसल्या नंदन।**
**धन्य आजि दिन सोनियाचा।।**
**कनक चवऱ्या ढळताती रामा।**
**विष्णूदास नामा गुढीयेसी।।**

श्रीरामचंद्र ज्या दिवशी वनातून अयोध्येत परत आले त्या दिवशी अयोध्येत सर्वत्र आनंदाचे झरे वाहत होते. अयोध्येच्या नागरिकांना पराकोटीचा आनंद झाला होता. गृहिणींनी सकाळी उठून सडासंमार्जन करुन आकर्षक, रेखीव, मनमोहक अशा रांगोळ्या काढल्या होत्या. घरेदारे फुलांच्या माळांनी सजविले होते. आबालवृद्धांनी नवीन कपडे परिधान केले होते. घरोघरी सुशोभित गुढ्या उभारल्या होत्या. पशुपक्षी, लतावेली हर्षोल्लोसित होऊन डोलत होत्या. नगारे, ढोलताशे, सनई यांचे सूर मंगलमय वातावरण निर्माण करीत होते. श्रीरामाची सीतामाई आणि लक्ष्मणासह उत्साहाच्या वातावरणात मिरवणूक निघाली होती. वातावरणाने भारावलेल्या लक्ष्मणाचे लक्ष एका गुढीवर गेले. गुढीला अत्यंत साधे आणि जुने वस्त्र नेसवलेले पाहून लक्ष्मणाने श्रीरामाला विचारले, ''प्रभो, सर्व घरांवर उभारलेल्या गुढ्या आणि या घरावरील गुढी यात फरक दिसत आहे. असे का ?''

''लक्ष्मणा, तू म्हणतोस ते बरोबर आहे. चल. जाऊन पाहूया...'' असे म्हणत प्रभू रथातून उतरले. ते त्या घरात गेले. श्रीराम अचानक आलेले पाहून यजमानाची तारांबळ उडाली. श्रीरामाचे यथोचित स्वागत झाल्यानंतर श्रीरामाने विचारले, ''आपल्या घरावर साधी गुढी उभारली असे दिसले. का बरे असे? काही अडचण आहे का?''

''प्रभो, आपण येणार हे समजताच आमचाही आनंद गगनात मावत नव्हता! परंतु आमच्या घरातील एक ज्येष्ठ व्यक्ती मृत झाली असल्याने घरात दुःखाचे वातावरण आहे. आम्ही आपल्या चरणी प्रार्थना करीत होतो की, आपले दर्शन होईपर्यंत त्यांनी अखेरचा श्वास घेऊ नये. ती व्यक्ती आपली परमभक्त होती. त्यांनी स्वतःचा अखेरचा क्षण ओळखला होता. त्यांनी आम्हाला सांगितले, माझ्या भाग्यात श्रीरामाचे दर्शन होणे नाही. मी प्राण सोडल्यानंतर दुःख करीत बसू नका. प्रभू श्रीरामाचे स्वागत आनंदाने करा. आपल्या दारी गुढी उभारा आणि त्या गुढीला हे वस्त्र अर्पण करा. ज्यावेळी प्रभू वनवासात जात होते, तेव्हा त्यांची पाऊले जिथे-जिथे पडत होती, तिथली धूळ मी जमा करुन प्रभूचा आशीर्वाद म्हणून या वस्त्रात ठेवली होती...''

ते ऐकताच श्रीराम त्या गुढीजवळ गेले. स्वतःच्या कंबरेला गुंडाळलेला शेला त्यांनी गुढीला अर्पण केला आणि तो जुना कपडा काढून स्वतःच्या कंबरेला बांधला. त्या घरात आनंदाचे वातावरण पसरले...

आजही दरवर्षी गुढीपाडव्याच्या दिवशी गृहिणी सकाळी लवकर उठून अंगणाची स्वच्छता करून सडा टाकतात. सुबक, मनमोहक रांगोळ्या काढतात. पुरुष मंडळी बाहेर जाऊन कडुनिंबाची मोहर आलेली फांदी, आंब्याची डहाळी आणतात. कडुनिंबाची पाने आंघोळीच्या पाण्यात टाकून स्नान करतात. कडुनिंबाच्या पानासोबत ओवा, मीठ, हिंग, मिरे आणि साखर यांचे मिश्रण करुन खातात. त्यामुळे पचनशक्ती सुधारते, पित्त नाश होतो, त्वचारोग बरा होतो. गुढीपाडव्याला केवळ धार्मिक महत्त्व नाही तर आरोग्याचीही जोड आहे. सामाजिक एकतेचा संदेशही दिला जातो कारण गुढीपाडव्याच्या दिवशी शोभायात्रा, मिरवणुका काढण्याची परंपरा आहे. या शोभायात्रांमध्ये श्रीमंत, गरीब यासोबत विविध जातीचे आणि धर्माचे लोक भाग घेतात.

चैत्र प्रतिपदेपासून नवीन संवत्सर, शालिवाहन शक सुरु होते. यामागेही एक कथा आहे... शालिवाहन यांचा जन्म कुंभार कुटुंबात झाला होता. एकदा एक प्रबळ शत्रू राज्यावर चाल करून आला त्यावेळी पराभव समोर दिसत असताना शालिवाहन राजाने सहा हजार मातीचे सैनिक तयार करुन त्यांच्या शरीरात प्राण फुंकले. त्या सैनिकांनी प्रबळ शत्रूचा पराभव केला. तो दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा! या विजयामुळे शालिवाहन शक ही कालगणना सुरु झाली. शिव-पार्वतीच्या विवाहाचा दिवसही चैत्र शुद्ध प्रतिपदा! पार्वतीमाता लग्नानंतर महिनाभर माहेरी राहायला आली तोही चैत्र महिना! त्या प्रित्यर्थ चैत्र शुद्ध तृतीयेला चैत्रा गौरीचे अनेक घरांमधून आगमन होते. महिला हळदीकुंकवाचे आयोजन करतात. चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त! या मुहूर्ताचे औचित्य साधून हिंदू समाज नवीन खरेदी, व्यवसाय, नवोपक्रमांचा, शुभ कार्यांचा प्रारंभ मोठ्या भक्तिभावाने करतात. याच दिवसांपासून शेतकरी वर्ग शेतीची कामे मोठ्या आशेने, जिद्दीने सुरु करतो.

गुढीपाडव्यापासून श्रीराम जन्मोत्सवाची सुरुवात होते. नऊ दिवस महोत्सवाचे ठिकठिकाणी आयोजन होते. नवव्या दिवशी श्रीराम नवमीला अत्यंत उत्साहाच्या वातावरणात श्रीराम जन्माने या महोत्सवाची सांगता होते. पुराणातील माहितीनुसार ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली तो दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा!

रामायणाप्रमाणे महाभारतातही या दिनाला विशेष महत्त्व आहे. महाभारताच्या आदिपर्वात उपरिचर नावाचा राजा होता. त्याला इंद्र राजाने कळकाची काठी दिली होती. या काठीचे महत्त्व लक्षात घेऊन राजाने ती काठी इंद्र राजाच्या आदरापोटी जमिनीत रोवली. दुसऱ्या दिवशी नववर्षाच्या पहिल्या दिवशी तिची षोडशोपचारे पूजा केली. नंतरच्या राजांनी ही प्रथा पाळली. गुढीपाडवा हा सण स्नेहाचा, मांगल्याचा, उत्साहाचा आणि विजयाचे प्रतीक मानला जातो.

संत चोखामेळा म्हणतात,

**टाळी वाजवावी गुढी उभारावी,**
**वाट ती चालावी पंढरीची।**

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर लिहितात,**

**एकें संन्यासी तोचि योगी।**
**ऐसी एकवाक्यतेची जगीं।**
**गुढी उभविली अनेगीं। शास्त्रांतरी।।**

संत तुकाराम महाराज यांच्या एका अभंगात असलेले वर्णन...

**पुढे पाठविले गोविंदे गोपाळा।**
**चपळा हाती गुढी।।**

प्राचीन काळापासून चालत आलेल्या सणाचे महत्त्व सर्वांना माहीत आहेच. चला तर मग, या गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर आपणही गुढी उभारुन सामाजिक एकतेचा, निरामय आरोग्याचा संकल्प करुया!

■■

च प श क चपराक प्रकाशन
www.chaprak.com
२५ व्या वर्षात पदार्पण
पुढील वर्धापनदिनापर्यंत
(१२ जानेवारी २०२७)
चपराक आणि लाडोबा प्रकाशनाच्या
सर्व पुस्तकांवर
२५ टक्के सवलत
ग्रंथसूची मागविण्यासाठी आमच्या ७०५७२९२०९२ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप करा.
ग्रंथसूचीसाठी स्कॅन करा
वाचकांचे मनःपूर्वक आभार!



तृप्ती वाकोडकर-देशपांडे, डोंबिवली
९९७०६२९१४२

कथा




**आठवीत शिकणारी जानकी आज पहिल्यांदाच तिच्या आईसोबत मुंबईला आली होती. तिचा बा एका मोठ्ठ्या इमारतीच्या बांधकामासाठी गेली दोन वर्षे मुंबईतच होता आणि ह्या मायलेकी गावाकडे लोकांच्या शेतात रोजंदारीवर काम करायच्या. खुरपणी, नांगरणी, पिकांची कापणी अशी कामे करत करत, रिकाम्या दिवशी गोधडी शिवून देण्याचे कामही अगदी कलाकुसरीने करायच्या.**

शेतातल्या कामापेक्षा हे गोधडी शिवण्याचे कामच जानकी जास्त मनापासून करायची. वेगवेगळे टाके घालून साध्याशा कापडाचं रूप खुलवून टाकायची. आताशा तर गावातील बायका लग्नाच्या रुखवतात ठेवण्यासाठीही बऱ्याच गोष्टी तिच्याकडून बनवून घ्यायच्या आणि ती सुद्धा अगदी मन लाऊन ही कामं करायची! पण मागच्याच आठवड्यात मुंबईत इमारतीचे काम करताना तिचा बा चक्कर येऊन पडला आणि या मायलेकींना काही इथे स्वस्थ बसवेना. असेल त्या परिस्थितीत राहण्याचे मनाशी ठरवून आज या दोघी मुंबईत हजर झाल्या होत्या.

दहा-बारा इमारती असलेली एक मोठी सोसायटी तयार होणार होती. रघुनंदन सोसायटी. त्यातील चार इमारतींचे काम सध्या पूर्ण झाले होते. एक विश्वासू कामगार म्हणून जानकीच्या बा ला तिथेच वॉचमॅनचे काम मिळाले होते. दिवसभर बांधकामावर जायचे आणि रात्री पुन्हा वॉचमनचे काम करायचे. ह्या धावपळीमुळेच त्याची तब्येत बिघडली होती पण आता जानकी आणि तिच्या आईच्या येण्याने त्याला आधार मिळणार होता. एका छोट्याशा खोलीत अगदी काही वेळातच सामानाची मांडामांड करुन त्यांचा इथला संसार सुरू झाला.

नवीन ठिकाणी अजून शाळेत नाव भरती करायचे बाकी होते त्यामुळे जानकीकडे सध्या भरपूर रिकामा वेळ होता. तयार झालेल्या चार इमारतींमध्ये लोकं राहायला आली होती. उच्चभ्रू लोकांचा थाटमाट, त्यांच्या मोठाल्या गाड्या, झकपक कपडे हा सगळा तिच्या कुतुहलाचा विषय बनला होता. तिच्या गावापेक्षा सगळंच कसं वेगळं होतं तिच्यासाठी! पण एकदा का शाळा, कॉलेज, ऑफिसची घाई संपली की, दुपारी अगदी शांतता असायची सगळीकडे.

ना खेळायला मैत्रिणी, ना शाळेचा अभ्यास, ना शेतीची कामं...! त्यामुळे हा दुपारचा वेळ कसा घालवायचा म्हणून तिची रोज आईच्या मागे भुणभुण असायची. शेवटी आईने तिला एक सुती साडी आणि सुई-दोरा दिला. भरतकाम तिच्या आवडीचे असल्याने आता दुपारी काय करायचे हा प्रश्नच मिटला. रोज शांत दिसणाऱ्या सोसायटीत आज जरा वेगळंच वातावरण होतं. सोसायटीच्या बोर्डवरची सूचना वाचुन प्रत्येक जण उत्साही दिसत होतं. जानकीनेही येऊन आईला सांगितले, ''इथे गुढीपाडव्यानिमित्त स्पर्धा ठेवलीये. ज्यांची गुढी सर्वात सुंदर, त्यांना बक्षीस मिळणारे.''




यावर्षी आपल्याला वेगवेगळ्या गुढी पाहायला मिळणार म्हणून जानकी खूश होती. नाही तर तिच्या छोट्याशा गावात अगदी मोजक्याच घरी गुढी उभारली जायची. एकदा लहान असताना तिने आईला विचारलेही होते, ''आपण का गं नाही उभारत गुढी?'' तेव्हा आई म्हणाली होती, ''अंगावर नेसायलाच साडी मिळणं कठीण झालंय, गुढी उभारायला कुठून आणु नवीन साडी?'' त्यानंतर मात्र जानकीने कधीच आईजवळ तो विषय पुन्हा काढला नाही.

मधले पंधरा दिवस असेच गेले आणि मग गुढीपाडव्याचा दिवस उजाडला. सकाळी अगदी लवकर आवरुन, सडा रांगोळी करून , दाराला तोरण बांधून गुढी पाहण्यासाठी जानकी बाहेर निघाली. प्रत्येकाच्या बालकनीमध्ये अगदी सुंदर सुंदर काठा पदराच्या साड्या नेसवून, छान डेकोरेशन करुन, फुलांची आरास करुन गुढी उभारली होती. प्रत्येक जण नटून थटून परीक्षकांची वाट पाहत उभे होते. जानकीचा तर सोसायटीत ३-४ वेळा फेरफटका मारून झाला होता. अखेर एका मोठ्या गाडीतून परीक्षक आले. बक्षीस कोणाला मिळणार याची उत्सुकता असल्याने जानकीही घराबाहेरच बसून होती पण मोठ्या लोकांना अशी लुडबुड केलेली आवडत नाही म्हणून आईने तिला बळेच आत बोलावून घेतले.

आई म्हणाली म्हणून ती आत येऊन बसली खरी पण तिचं सगळं लक्ष मात्र बाहेरच होतं. तिचा पडलेला चेहरा पाहून आईलाही वाईट वाटलं पण काय करणार... लेकीला अजून जगाचा अनुभव नव्हता. उगाच कोणी बोलून अपमान केला असता तर तिला अजूनच वाईट वाटले असते. त्यापेक्षा हे बरे असा विचार आईने केला.

''बाळा, त्या बाजूच्या बिल्डींगमधल्या दुसऱ्या माळ्यावरच्या बर्वे आजींनी तुला बोलावलंय. म्हणाल्या आज पुरणपोळ्या करणारे. तुमच्या जानकीला पाठवा हो दुपारी. जाशील ना तू?''

त्यानिमित्ताने बाहेर जायला मिळेल म्हणून ती लगेच उठली आणि आजींकडे निघाली सुद्धा. आईला मात्र लेकीला नाराज केल्यामुळे खूपच वाईट वाटत होतं. तिला खूश करण्यासाठी आईला एक कल्पना सुचली आणि बा ला हाताशी धरून तिने लगेच कामाला सुरुवात केली. तिथे मात्र आजींच्या गप्पांमधून जानकीची काही सुटका होत नव्हती. तासाभरानंतर माईकवर सूचना ऐकू आली की, स्पर्धेचा निकाल जाहीर होणार आहे, त्यासाठी सर्वांनी खाली एकत्र जमायचे आहे. त्यावेळी मात्र जानकी पटकन उठली आणि आजींना नमस्कार करुन खाली आली.

उंची साड्या नेसून दागिन्यांनी मढलेल्या बायका, कुर्ता घालून मिरवणारी माणसं... सगळं काही तिच्यासाठी खूप नवीन होतं पण आईने सांगितल्यामुळे तिथे न रेंगाळता ती पुरणपोळीचं ताट घेऊन सरळ घरी आली. बघते तर काय, आज पहिल्यांदाच तिच्या घरी गुढी उभारली होती. तिचा तर आनंदच गगनात मावत नव्हता. ती आईला काही विचारणार, इतक्यात माईकवरून आवाज आला - प्रथम पारितोषिक विजेती आहे, जानकी देसाई! आपल्या इथे काम करणाऱ्या वॉचमन काकांची मुलगी. सगळेच जण आश्चर्याने एकदा तिच्याकडे आणि एकदा त्यांच्या त्या एका खोलीच्या घरासमोर उभारलेल्या गुढीकडे पाहतच राहिले. एवढ्या साध्याशा गुढीला प्रथम पारितोषिक?

सगळ्यांची कुजबुज ऐकून परीक्षकांनीच सांगायला सुरुवात केली - दिसायला जरी ही गुढी साधी असेल तरी खूप विशेष आहे. जानकीने स्वतःच्या हाताने या साडीवरती भरतकाम करुन रामाच्या वनवासातील प्रत्येक महत्त्वाचा क्षण आणि वनवास संपवून अयोध्येत परतणारे श्रीराम, लक्ष्मण आणि सीता ह्यांचे दर्शन घडविले आहे. पैठणी, कांजीवरम किंवा अजून कुठल्याही भारी साड्यांपेक्षा ही साडी नेसवून उभारलेली गुढी आजच्या दिवसाचे महत्त्व दर्शविते. म्हणून आजच्या बक्षिसाची मानकरी ही छोटीशी जानकी देसाई.

टाळ्यांच्या कडकडाटासोबत परीक्षक अजूनही पुढे बोलतच होते - योग्य तो मोबदला देऊन ही साडी मला जानकीकडून विकत घ्यायची आहे. अर्थात तिची ईच्छा असेल तरच. आता मी जानकीला बक्षीस घेण्यासाठी स्टेजवर आमंत्रित करतो.

जानकीचा तर विश्वासच बसत नव्हता या सगळ्या गोष्टींवर. बक्षीस स्वीकारुन, सर्वांचे आभार मानून ती पळतच आईजवळ गेली आणि आईला मिठी मारून म्हणाली, ''आई, हे सगळं तुझ्यामुळेच झालं.''

तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवत आई म्हणाली, ''माझ्यामुळे नाही बाळा, सगळ्याचा करता करविता तो रामच असतो. जे काही होत असतं ते फक्त रामाच्या इच्छेने.'' हे ऐकताच जमलेल्या लोकांमधून एकाने जोरात घोषणा दिली, 'जय श्री राम!' आणि त्यापाठोपाठ प्रत्येकाने त्याला साथ दिली. सारा परिसर रामनामाने दुमदुमला. नव्यानेच निर्माण झालेल्या रघुनंदन सोसायटीतील पहिला गुढीपाडवा अशा पद्धतीने अगदी जल्लोषात साजरा झाला.

# पारपत्र कार्यालयातील सुखद अनुभव



चंद्रलेखा बेलसरे-जगताप, पुणे
९८५०८९५०५१


**माझ्या पारपत्राची मुदत आता संपत आली होती म्हणून दिनांक ११ मार्च २०२६ रोजी मला त्याच्या नुतनीकरणासाठी पारपत्र कार्यालयात जायचे होते. त्यासाठी मी जानेवारी २०२६ लाच अर्ज भरला होता आणि मार्च महिन्याची तारीख मिळाली होती. दुपारी १२.३० ची वेळ दिलेली असल्याने मी जरा लवकरच म्हणजे ११.४५ च्या दरम्यान तिथे पोहोचले. बाहेर असलेली तुडुंब गर्दी पाहून आधी जीवच दडपला. मार्च महिन्याच्या टळटळीत उन्हात अनेक लोक बाहेर बसले होते. एवढी गर्दी पाहून वाटले, आता आपला नंबर यायला २-३ नक्कीच वाजणार! कदाचित ४-५ देखील वाजू शकतात! पण काय करणार? नुतनीकरण करणे तर गरजेचे होते.**

धाडसाने गेटजवळ पोहोचले. पारपत्र कार्यालयाकडून मोबाईलवर आलेला संदेश तेथील दारवानाला दाखवला. त्याने आत जाण्यास परवानगी दिली, हा पहिला सुखद धक्का! मी माझ्याबरोबर माझ्या एका सहाय्यकाला घेऊन गेले होते. ती देखील माझ्याबरोबर आत येऊ लागली. तिला पाहून गेट किपरने मला प्रश्न विचारला, ''मॅडम तुम्ही सिक्स्टी पार आहात का?'' त्याला 'हो' असे उत्तर दिल्यावर त्याने माझ्या सहाय्यकाला माझ्याबरोबर आत जाऊ दिले.

समोरच काउंटर होते. तेथे महिलांची रांग होती. बऱ्याच वयस्क महिला यासाठीच (पासपोर्ट रिनीवलसाठी) आल्या होत्या. प्रत्येक जण आपापली कागदपत्रे दाखवून बसलेल्या कर्मचाऱ्याकडून टोकन नंबर घेत पुढे मार्गस्थ होत होते. काहींची कागदपत्रे अपुरी होती, काहींनी कागदपत्रांची झेरॉक्स आणली नव्हती. काहींची विहित नमुन्याची कागदपत्रे नव्हती. त्यांना तेथील कर्मचारी मार्गदर्शन करीत होते.

त्याच केबिनमध्ये समोरच झेरॉक्सची व्यवस्था होती. तेथे जाऊन ज्या पद्धतीची कागदपत्रे लागत होती त्या प्रकारच्या कागदपत्रांचे झेरॉक्स मिळण्याची सोय होती. हा दुसरा सुखद धक्का! कारण बऱ्याच सरकारी कार्यालयात एका झेरॉक्ससाठी गरजूंना वणवण भटकावे लागते आणि तोपर्यंत रांगेत लागलेला क्रमांक मागे पडतो. येथे तर त्याच केबिनमध्ये ह्या सर्व गोष्टींची पूर्तता होत होती. हे सर्व पाहून खरंच खूप आनंद झाला. आता आपल्याला कागदपत्रांमध्ये काही अपूर्णता असली तर रांग सोडून बाहेर जावे लागणार नाही, याची खातरी पटली. अर्थात ह्याची कल्पना असल्यामुळेच मी माझ्या मदतनीसाला बरोबर घेऊन गेले होते. अशीच वेळ आल्यावर मला तिचे सहाय्य घेता येणार होते पण मी बरोबर आणलेली कागदपत्रे पूर्ण होती म्हणून मला लागलीच टोकन नंबर मिळाला.

पुढे असलेल्या गेटमधून मी आत शिरले. तेथे




देखील बरीच गर्दी होती. प्रत्येकाचे टोकन नंबर फलकावर दिसत होते आणि आपले टोकन नंबर झळकण्याची प्रत्येक जण वाट पाहत होते. तेथेच एक सहाय्यक बसला होता. त्याने मला ए विंगमध्ये जाण्यास सांगितले. तेथे ए - २१,२२,२३ असे कंपार्टमेंट होते. तेथे गेल्यावर ५ मिनिटाच्या प्रतीक्षेनंतर लागलीच बोलावणे आले. तिथे कागदपत्रांची स्क्रूटीनी झाली. थम्ब इम्प्रेशन घेतले गेले, फोटो काढला गेला. माझ्या वयाकडे पाहून त्या कर्मचाऱ्याने विचारले, ''मॅडम, तत्कालमध्ये का अप्लाय केले नाही? तुम्हाला जास्त वेळ थांबावे लागले नसते!''

आता मला माझी चूक लक्षात आली होती पण अनावधानाने ती चूक झाली होती. माझ्या चेहऱ्यावरील भाव पाहून तो कर्मचारी म्हणाला, ''काही हरकत नाही, पुढील १० मिनिटात तुमचे काम होऊन जाईल!'' त्याचे दिलासादायक बोलणे ऐकून जीवात जीव आला. हाही एक सुखद धक्काच होता. नंतर बी विंगमध्ये पाठवणी करण्यात आली. तेथेही उपस्थित सर्व जण आपल्या टोकन नंबरची प्रतीक्षा करत होते. तेथील कर्मचाऱ्याला विचारले, ''हा टोकन नंबर केव्हा येईल? जास्त वेळ लागेल का? कारण आत्ता तर मागचेच नंबर फलकावर रिफ्लेक्ट होत आहेत. तोपर्यंत बाहेर प्रतीक्षालयात जाऊन बसू का?'' तर तो म्हणाला, ''नको मॅडम, जास्त वेळ लागणार नाही. लागलीच नंबर येईल'' अन् खरोखरीच दुसऱ्या मिनिटाला माझा टोकन नंबर फलकावर झळकला. तेथेही भर्रकन काम झाले.

आता तिसऱ्या सी विंगमध्ये जायचे होते. तेथेही केबीनच्या दरवाजाजवळ मार्गदर्शकाचे काम करणारा कर्मचारी बसला होता. त्याने अमक्या अमक्या टेबलवर जायला सांगितले आणि दोनच मिनिटात नोंद करून माझी कागदपत्रे त्या अधिकाऱ्याने मला परत केली. उठता उठता मी त्याला विचारले, ''संपले ना माझे काम? आता जाऊ का?'' त्याने हसून म्हटले, ''बिनधास्त जा. आता पोलीस व्हेरिफिकेशनला जावे लागेल. त्याचा मेसेज तुमच्या मोबाईलवर येईल!'' आता मात्र मला आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहिला नाही. कुठे ती गर्दी पाहून मी कल्पना केली होती की, मला दुपारचे ३-४ नक्कीच वाजतील पण ११.४५ ला पासपोर्ट ऑफिसमध्ये प्रवेशलेली मी चक्क तेथून१२.०७ ला बाहेर पडत होते. केवळ १५ ते १७ मिनिटात माझी सुटका झाली होती. आधी प्रवेशद्वार, नंतर सुरक्षा तपासणी, मग कागदपत्रांची पडताळणी, नंतर ए, बी, सी, विंगमधील प्रोसेस आणि चक्क काम झाले! खरंच हा अनुभव विलक्षण होता आणि सुखद धक्का देणारा होता.

उठता उठता मी त्या अधिकाऱ्याला धन्यवाद देण्यास तर विसरले नाहीच पण येथे दिल्या गेलेल्या उत्तम सेवेचे देखील कौतुक केले कारण ते माझे नैतिक आणि सामाजिक कर्तव्य होते. अशाप्रकारे तात्काळ आणि चोख काम करणाऱ्या आणि सेवा देणाऱ्या आपल्या कर्मचारीवर्गाचे कौतुक करायलाच पाहिजे होते. ते खरं तर प्रत्येकानेच करायला पाहिजे.

पण सरकारी कार्यालयाचा आपला अनुभव नेहमीच तसा चांगला नसतो. एका एका लहानशा कामासाठी आपल्याला वर्षानुवर्षे पाठपुरावा करावा लागतो. गेल्यावर एकदाचे ही ही कागदपत्रे लागतील, असे त्या कार्यालयातून कधीच सांगण्यात येत नाही. आपली कामे सोडून असा पाठपुरावा करता- करता नाकीनऊ येते. फोनवर संपर्क साधून किंवा अनेकदा स्मरणपत्रे देऊन सुद्धा कामात दिरंगाई होत असते. आज एखादा कागद मागतील तर दुसऱ्यावेळी हा कागद दिला नाही, म्हणून काम खोळंबले आहे, असे सांगण्यात येते. त्यामुळे 'शिंगरू मेले हेलपाट्याने' अशी स्थिती होऊन जाते. अनेकदा काही जण तर हताश होऊन त्याचा नादच सोडून देतात. वयस्क लोकांची तर खूपच कुचंबना होते. एकाचवेळी गरजेच्या कागदपत्रांची यादी दिली तर येणारा गरजू त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनच येईल. त्यामुळे त्याच्या वेळेचा अपव्यय देखील होणार नाही आणि त्याचे काम वेळेच्या आत पूर्ण करून दिल्याचे समाधान देखील सरकारी कर्मचाऱ्यांना मिळेल पण आपल्याकडील व्यवस्थाच अशी आहे की, असे होताना दिसत नाही.

आता एखादे काम त्या विशिष्ट विभागाकडे आल्यावर ते काम पूर्ण करणे त्या विभागाची, तेथील कर्मचाऱ्याची जबाबदारी असते. मग त्यात चालढकल करून त्याचा आणि सरकारी कार्यालयाचा वेळ वाया घालवण्यात काय अर्थ आहे? याचा विसर पडतो. अर्थात आजकाल पुरेसे कर्मचारी नाहीत त्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण आहे, ही कारणे देऊन जनतेला तिष्ठत ठेवण्यात येते. इकडे देशातील असंख्य तरुण बेरोजगार आहेत, त्यांच्या हाताला काम नाही आणि इकडे पुरेसे कामगार नाहीत म्हणून ओरड केली जाते. किती विदारक चित्र आहे न आपल्या देशाचे? मग पारपत्र कार्यालयावरच का सरकार मेहेरबान आहे, की जेथे पुरेसे कर्मचारी कार्यरत आहेत? ह्याचा विचार मनात येतो. असो, त्या दुसऱ्या अनुभवांबद्दल पुढे कधीतरी!

तूर्त मला पासपोर्ट ऑफिसमधील आलेला अनुभव मात्र सुखदायक होता. तेथे विनम्रतापूर्वक दिली गेलेली वर्तणूक, वेळोवेळी केले गेलेले सहाय्य, मार्गदर्शन, तेथील शिस्त आणि वेळकाढूपणा न करता केलेली कार्यतत्परता हे पाहून अचंबित व्हायला झाले. बहुतेक सरकारी कार्यालयातील हा माझा पहिला सुखद अनुभव होता. अशीच यंत्रणा जर प्रत्येक कार्यालयात राबविली गेली तर जनतेची होणारी पिळवणूक, ससेहोलपट थांबेल आणि देशाची जनता सुखी होईल, ह्यात शंका नाही पण तसे झाले पाहिजे.

## लिहिणाऱ्या हातांसाठी 'चपराक'चे व्यासपीठ

साप्ताहिक 'चपराक'साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा. प्रवास वर्णन, वाचलेल्या आणि भावलेल्या पुस्तकांचे परिचय, आवडलेली व्यक्तिचित्रणे आदींचे स्वागत. सोबत काही पूरक छायाचित्रे, चित्रे असतील तर तीही पाठवा. ती ज्यांच्याकडून घेतली आहेत त्यांची नावेही कळवा. निवडक साहित्यास 'चपराक'मधून प्रसिद्धी दिली जाईल.

आपला मजकूर युनिकोडमध्ये खालील नंबर किंवा ई-मेलवर पाठवा.

**भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०.**

**ई मेल : info@chaprak.com**


**गुढीपाडव्याच्या लेखांमुळे या अंकात मयूर बागुल, भरत पाटील, रमा जाधव यांची सदरे घेता आली नाहीत.**

# वाढत्या रस्ते अपघातांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे

## प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची संसदेत मागणी; महामार्गालगत दारूच्या दुकानांना परवानगी देऊ नये

**पुणे, (प्रतिनिधी) :** देशात वाढत्या रस्ते अपघातांच्या गंभीर समस्येकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्यकाल उल्लेखाद्वारे केली. बेफिकीर वाहनचालक, मद्यपान करून वाहन चालवणे तसेच सोशल मीडियासाठी रस्ते व महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याची वाढती प्रवृत्ती ही अपघातांची नवी व चिंताजनक कारणे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशात सुमारे १.७८ लाख लोकांचा रस्ते अपघातांमध्ये मृत्यू झाला आहे. म्हणजेच दररोज शेकडो कुटुंबांवर ही दुर्घटना ओढवते. विशेषतः १८ ते ३४ वयोगटातील तरुणांचे प्रमाण



सुमारे ६० टक्के असल्याने ही बाब अधिक चिंताजनक आहे. महाराष्ट्रातही आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२४ मध्ये ३६ हजार ८४ रस्ते अपघातांची नोंद झाली असून, त्यात १५ हजार ३३५ जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यातही परिस्थिती चिंताजनक असून, पुणे पोलिसांच्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये १,४०४ अपघातांमध्ये ३२० जणांचा मृत्यू झाला तर १,३२० जण जखमी झाले. २०२३ मध्ये ही संख्या १,२३० होती.''

सोशल मीडियासाठी रस्ते व महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असून अपघातांचा धोका वाढत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. मोटार वाहन कायदा १९८८ अंतर्गत मद्यपान करून वाहन चालवणे व बेफिकीर वाहनचालकांवर कठोर शिक्षेची तरतूद असली तरी अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर मद्यपान करून वाहन चालवणे, त्यांच्यासाठी किमान कठोर शिक्षा निश्चित करणे, रस्ते अपघातांशी संबंधित मृत्यू प्रकरणांसाठी फास्ट-ट्रॅक न्यायालये स्थापन करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित वेग शोध प्रणाली, ब्रेथ ॲनालायझर व सीसीटीव्ही यांचा व्यापक वापर करणे तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासारख्या उच्च वेगाच्या मार्गांवर अपघातप्रवण ठिकाणांचे नियमित सुरक्षा लेखापरीक्षण करणे, अशा उपाययोजनांची मागणी त्यांनी केली. तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये रस्ते सुरक्षा व जबाबदार वाहनचालनाबाबत जनजागृती मोहीम राबविणे आणि अपघातग्रस्त व त्यांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली.

---

# नवी सुरुवात



**कस्तुरी देवरुखकर**
मुंबई
८२९११४९९९२

**वसंताची चाहूल लागताच संस्कृतीच्या सुवर्णपानावर साडेतीन मुहूर्तांची मोहोर घेऊन येतो आपला मराठमोळा सण 'गुढीपाडवा'. चैत्र शुद्ध प्रतिपदेचा हा दिवस म्हणजे हिंदू नववर्षाचा आरंभ.**

रानीवनी वसंताने झुलणारे नवलाईचे स्वरूप न्याहाळताना, चैत्र महिन्यात निसर्गात झालेले बदल पाहता असे जाणवते की, निसर्ग जणू म्हणतो आहे... ''झाले गेले विसरून नव्या उमेदीने पुन्हा श्रीगणेशा करा...'' म्हणूनच पानगळीचा शिशिर ओसंडून गेल्यावर चैत्रात झाडांना नवी पालवी फुटते. अशीच नवी सुरुवात करून देण्यासाठी गुढीपाडवा साजरा केला जातो.

**गुढीचे महत्त्व...**

गुढीचे पौराणिक महत्त्व असे सांगितले जाते की प्रभू श्रीरामांनी चौदा वर्षांचा वनवास भोगून आणि रावणाचा पराभव करून ज्या दिवशी अयोध्येत प्रवेश केला, त्या दिवशी तेथील प्रजेनं आनंदाने घरोघरी विजयाची गुढी उभारली. तोच हा गुढीपाडव्याचा दिवस मानला जातो.

गुढीपाडव्यापासून शालिवाहन राजाच्या नावाने नवीन कालगणना 'शालिवाहन शक' सुरू होते तसेच ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टीची निर्मिती केली, असेही मानले जाते.

पुरातन काळात मानवाने दैवी शक्तिची कल्पना करताना आदिशक्ती, आदिमाया पार्वतीच्या रूपाचे पूजन केले. म्हणून पाडव्याच्या दिवशी स्त्रीशक्तिच्या रूपाचे मनोमन पूजन केले जाते. हीच ती चैत्र नवरात्र. याच दिवशी देवाधिदेव शंकर आणि पार्वती देवीचे लग्न ठरले, असेही सांगितले जाते.

माझ्या माहेरी दरवर्षी गुढी उभारली जाते. गावचे अंगण स्वच्छ करून घरासमोर सुंदर रांगोळी काढली जाते. उंबरठ्याचे पूजन करून दरवाज्याला झेंडूच्या फुलांच्या माळा तसेच आंब्याच्या डहाळ्या लावतात. बांबूच्या उंच काठीला रेशमी वस्त्र नेसवून त्यावर कडुलिंबाची डहाळी बांधतात. तिला सजवताना झेंडूच्या फुलांचा हार, साखरेच्या गाठींची सुरेख माळ घालतात आणि त्यावर तांब्याचा कलश उलटा ठेवतात. ही गुढी दारासमोर पाटावर उभारली जाते.

उंच काठीवर उभारलेली ही गुढी म्हणजे आपल्या आयुष्यातील यशाचे शिखर दर्शवते. या दिवशी स्नान उरकल्यावर सर्वांत आधी कडूनिंबाचे पान खाण्याची प्रथा आहे. त्यानंतर तोंडात गोड पदार्थ टाकला जातो. असे का? हे मी एकदा आईला विचारले असता ती म्हणाली, ''नववर्षाच्या सुरुवातीला आयुष्यात घडून गेलेल्या कडवट आठवणी चावून संपवायच्या आणि गोड पदार्थाचा आस्वाद घेत येणाऱ्या नववर्षात तो गोडवा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहायचे.''

तिचा हा विचार खूप काही सांगून गेला.

भक्तिभावाने पूजा-अर्चना झाल्यानंतर दुपारी श्रीखंड-पुरी व इतर गोड पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. तिन्हीसांजेला गुढी उतरवली जाते. या दिवशी आप्तेष्ट, मित्रपरिवारातील स्त्री-पुरुष आणि लहान मुले पारंपरिक वेशभूषेत एकत्र येतात. स्त्रिया नऊवारी लुगड नेसून, नाकात नथ आणि गळ्यात ठुशी घालून सजतात तर पुरुष सदरा, लेंगा व टोपी परिधान करतात. सर्व जण एकमेकांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देतात. ठिकठिकाणी शोभायात्राही काढली जाते आणि त्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण उत्साहाने सहभागी होतात.

या साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या शुभदिनी नवीन वाहन, घरातील महत्त्वाच्या वस्तू किंवा दागिने खरेदी केले जातात. गुढीपाडवा हे हिंदूंचे नववर्ष आहे. या दिवशी प्रत्येक जण काही ना काही संकल्प मनाशी करतो. ते पूर्ण होतात किंवा नाही हा वेगळा भाग; परंतु संकल्प करण्यातही एक आगळीच आनंदाची अनुभूती असते.

**चैत्र गौरीचे व्रत...**

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्यापासून 'चैत्र गौरीचे' व्रत सुहासिनी करतात. व्रताचा सोहळा साजरा करताना हळदी-कुंकू समारंभ केला जातो. या दिवशी शेजारच्या बायका-मुलींना घरी बोलावून त्यांचे आदरातिथ्य केले जाते. उन्हाळ्याचे दिवस असल्याने कैरीचे पन्हे, थंडगार व सुगंधी वाळा सरबत, कैरी घालून केलेली हरभऱ्याची वाटली डाळ, कलिंगड इत्यादी पदार्थ देवीच्या नैवेद्याचा प्रसाद म्हणून महिलांना दिले जातात.

या व्रतात देवी पार्वतीला माहेरवाशीण मानून देव्हाऱ्यात गौराईची स्थापना करतात. अक्षयतृतियेला देवी सासरी परत जाते अशी धारणा मनी ठेवून व्रताचे उद्यापन केले जाते. आध्यात्माचा धागा पकडून वर्षानुवर्षे केली जाणारी ही पारंपरिक व्रत-वैकल्ये म्हणजे ऋतुचक्रातील बदलांना सामोरे जाताना शारीरिक बल टिकून राहण्यासाठी केलेली उपाययोजना असते. हीच आपल्या पूर्वजांची किमया आणि देणगी आहे. म्हणून असे महत्त्वपूर्ण रीतिरिवाज त्यांच्या मागील भूमिकेसह समजून घेऊन पाळायला काय हरकत आहे!

**गुढी उभारा चैतन्याची...**

आपल्या मराठी संस्कृतीत जी गुढी दारासमोर उभारली जाते ती आपल्या सुख-समृद्धीचे व कीर्तीचे प्रतीक असते. अशीच दुसरी गुढी प्रत्येकाने मनात उभारली पाहिजे. चांगल्या विचारांची, समाजसेवेची, समानतेची, एकोप्याची आणि स्त्रीसन्मानाची.

उत्तम कर्मामुळे आयुष्यात येणाऱ्या चैतन्याची गुढी उभारली तर चैत्राची सोनेरी किरणे अंतर्बाह्य आपल्यात सामावतील, जीवन उजळून टाकतील आणि यशाचा ध्वज उंच आकाशात फडकवतील. सर्वांना गुढीपाडव्याच्या आणि मराठी नववर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देताना ही काव्यसुमन भेट.

**आली चैत्राची पहाट**
**नववधूचा शृंगार थाट**
**चहूदिशांना चैतन्याची लाट**
**हास्यरत्ने घरादारात..**
**गुढी उभारता मांगल्याची**
**नवं पर्वाची सुरुवात**
**नव्या पालवीचे तोरण**
**बांधले काव्य उंबरठ्यात..**
**आरस्पानी शब्द रेखीले**
**हृदयाच्या धुंद ध्यासात**
**स्वप्नमैफिल रंगते**
**कस्तुरगंध दरवळतो श्वासात..**
**वर्षाच्या प्रथम दिनी**
**रसिकहो तुमची साथ**
**सौख्य लाभो कुटुंबाला**
**मागणे जोडुनी हात..**

# गुढीपाडवा : परंपरा, संतविचार आणि नव्या पिढीची दिशा



सचिन माथेफोड
थेऊर, पुणे
८९७५३२९७९७

**चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे मराठी संस्कृतीत नव्या वर्षाची पहाट घेऊन येणारा दिवस म्हणजे गुढीपाडवा. महाराष्ट्रातील प्रत्येक घरासमोर उभारली जाणारी गुढी ही केवळ सणाची परंपरा नसून विजय, मंगलता आणि नवचैतन्याचा उंचावलेला ध्वज आहे. नव्या वर्षाच्या प्रारंभी आशा, उत्साह आणि सकारात्मकतेने जीवनाची नवी सुरुवात करण्याचा संदेश हा सण देतो.**

भारतीय कालगणनेत चैत्र शुद्ध प्रतिपदेला विशेष महत्त्व आहे. पुराणपरंपरेनुसार या दिवशी सृष्टीची निर्मिती सुरू झाली, अशी मान्यता आहे. तसेच भारतीय शक संवत्सराची गणना देखील याच दिवसापासून सुरू होते, असे मानले जाते. त्यामुळे गुढीपाडवा हा केवळ सांस्कृतिक सण नसून कालगणनेच्या दृष्टीनेही नव्या प्रारंभाचे प्रतीक मानला जातो.

घरासमोर उभारली जाणारी गुढी ही विजय आणि शुभत्वाचे प्रतीक आहे. बांबूवर रेशमी कापड, साखरेची माळ, कडुनिंबाची पाने आणि उलटा ठेवलेला कलश यांचा समावेश असलेली ही गुढी म्हणजे नव्या वर्षाच्या स्वागताचा मंगलध्वजच. घरासमोर उभारलेली गुढी जणू सांगते, अंधारानंतर प्रकाश येतो आणि प्रत्येक शेवटानंतर नवा प्रारंभ घडतो. मराठी संतपरंपरेनेही जीवनात आनंद, समता आणि सकारात्मकतेचा संदेश दिला आहे. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळी जीवनातील आनंदाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करतात.

'आनंदाचे डोही आनंद तरंग'

नव्या वर्षाच्या प्रारंभी मनात आनंद आणि समाधान जागृत ठेवण्याचा हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तसेच संत ज्ञानेश्वर माउलींच्या विचारांमध्ये विश्वातील एकात्मतेचा भाव व्यक्त होतो.

'अवघा रंग एक झाला'

समाजातील भेदभाव विसरून एकात्मतेने जगण्याचा हा विचार सण-उत्सवांच्या माध्यमातून अधिक दृढ होत असतो.

गुढीपाडव्याच्या दिवशी कडुनिंब आणि गूळ खाण्याची परंपरा आहे. जीवनात गोड आणि कडू अनुभव येत असतात परंतु त्यांना समभावाने स्वीकारणे हेच जीवनाचे खरे तत्त्व आहे, हा संदेश या परंपरेतून मिळतो. नव्या वर्षाची सुरुवात करताना सकारात्मक विचार, नवे संकल्प आणि नवे ध्येय यांची आठवण हा सण करून देतो.

आजच्या बदलत्या आणि वेगवान जगात एक प्रश्न मात्र प्रकर्षाने समोर येतो की नव्या पिढीने हे सण का साजरे करावेत? आधुनिकतेच्या प्रवाहात अनेक



परंपरा मागे पडत असताना आपल्या सांस्कृतिक ओळखीचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. सण-उत्सव हे केवळ धार्मिक विधी नसून समाजाला एकत्र आणणारे सांस्कृतिक धागे आहेत. कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येणे, परंपरा पुढील पिढीकडे पोहोचणे आणि समाजात आनंदाचे वातावरण निर्माण होणे ही सणांची खरी ताकद आहे.

गुढीपाडवा साजरा करणे म्हणजे केवळ नववर्षाचे स्वागत नाही; तर आपल्या इतिहासाची, संस्कृतीची आणि मूल्यांची जाणीव जपणे होय. नव्या पिढीने सणांचे केवळ स्वरूप न पाहता त्यामागील अर्थ समजून घेणे आवश्यक आहे; कारण संस्कृती ही केवळ परंपरेत नाही तर विचारांत आणि आचरणातही जिवंत राहते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ नव्या वर्षाचा प्रारंभ नसून आशा, ऐक्य आणि संस्कृतीचा उंचावलेला ध्वज आहे. खरे सांगायचे झाले तर सण साजरे करणे चुकीचे की बरोबर यावर या नव्या पिढीने न अडकता ते आपल्याला आनंद देतात व त्यामुळे आपण दुसऱ्यांना आनंद देऊ शकतो याचा विचार करून सण साजरे करावेत कारण या धावपळीच्या जगात थोडीशी शांततापूर्वक सकाळ प्रत्येकालाच हवीहवीशी वाटतेच ना! नव्या वर्षाच्या या मंगल प्रारंभी प्रत्येकाच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि नवचैतन्य नांदो हीच अपेक्षा.

## शेतमालाचे बाजारभाव पडल्याने बळीराजा हैराण

**कदमवाकवस्ती, (चंद्रकांत दुंडे)** : अमेरिका, इस्त्रायल, इराण युद्धाची सध्याची परिस्थिती यामुळे व्यावसायिक सिलेंडरवर आलेले निर्बंध! यामुळे साधारणपणे पन्नास टक्के हॉटेल व्यवसायावर परिणाम होऊन सिलेंडर मिळत नसल्याने बऱ्याच हॉटेल व्यावसायिकांनी हॉटेल बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा फटका बळीराजाला बसत आहे.

मार्केटमध्ये आवक जास्त आणि मागणी कमी अशीच अवस्था आहे. त्यामुळे इतक्या कडक उन्हाळ्यात मेथी, कोथिंबीर, शेपू, पालक, कांदापात अशा भाजीपाल्याला दोन रुपयांपासून ते पाच रुपयांपर्यंत असा मातीमोल बाजारभाव मिळत आहे.उत्पादन खर्चही वसुल होत नाही, त्यामुळे बळीराजावर उपासमारीची वेळ आली आहे. सरकारने सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या पीक कर्जाला कर्जमाफी दिली आहे आणि नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान म्हणून पन्नास हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नियमित कर्ज भरणारे शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत. सरसकट कर्ज माफ करण्याची मागणी करत आहेत. नियमित कर्जदारांनी प्रथम ३१ मार्चपूर्वी कर्ज भरले तरच प्रोत्साहनपर अनुदान मिळणार आहे परंतु शेतमालाचे बाजारभाव पाहता घर चालवायला पैसे नाहीत तर कर्ज भरण्यासाठी पैसे आणायचे कोठून? असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आ वासून उभा आहे.

देशपांडे डोळ्यांचे हॉस्पिटल व लेसर सेंटर
NABH
१० व्या वर्धापन दिनानिमित्त
मोफत नेत्र तपासणी
तुमच्या आणि तुमच्या कुटुंबासाठी
१ मार्च ते ३१ मार्च पर्यंत मर्यादित
२०४, अनामिका बिल्डिंग, हॉटेल पुष्पकच्यावर, डावी भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
संपूर्ण नेत्रसेवा एकाच छताखाली ।
सर्व मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध.
आम्ही सीजीएचएस, ईसीएचएस, पुणे मेट्रो, पीएमसी, पीसीएमसी, सर्व सरकारी आणि खासगी विमा कंपन्यांसह कॅशलेससाठी पॅनेलवर आहोत.
संपर्क ८९२९३ ०४१४२ – ७५१७५ ५८८९९
कोथरूड | कोथरूड एनेक्स | पिरंगुट | देहू www.deshpandeeyehospital.com



निम्हण ग्रुप ऑफ कंपनीज
Group of Companies
नियोजित प्रकल्प
• सर्वे नं. १, पाषाण - भव्य निवासी व व्यापारी संकुल
• लवळे येथे रिंग रोडच्या परिसरात भव्य निवासी व व्यापारी संकुल
• निम्हण मळा येथे निवासी संकुल
• बावधन येथे निवासी संकुल
शुभेच्छुक
मा. श्री. तानाजीभाऊ रामचंद्र निम्हण
मा. नगरसेवक, पुणे म.न.पा. । मा. संचालक, संत तुकाराम सहकारी साखर कारखाना
अजय विजय निम्हण । निलेश नामदेवराव निम्हण

